## सापळा केस

दिनांक २९/०१/२०१९

**शेख हमीद शेख अहमद, वय ४८वर्षे, वरिष्ठ सहायक लेखा, पंचायत समिती कार्यालय मानवत ता.मानवत, जि.परभणी यांना ४०००/– रू. लाच घेताना रंगेहाथ पकडण्यात आले.**

यातील तक्रारदार यांनी दि.२८/०१/२०१९ रोजी असीबी कार्यालय परभणी येथे तक्रार दिली की, तक्रारदार यांचे पत्नीचे कालबध्द पदोन्नतीचे थक्कीत वेतनातून MSCIT संगणक परिक्षा उशिरा पास झाले म्हणून वेतन कपात न करता पुर्ण थकीत वेतनाचे बिल देण्यासाठी पंचायत समिती मानवत कार्यालयातील कर्मचारी हमीद हे ८०००/– रू. लाचेची मागणी करत आहे. त्यांचेवर योग्य ती कार्यवाही करावी वगैरे मजकुराची तक्रार दिली आहे.

त्यानुसार ब्युरोकडुन करण्यात आलेल्या कार्यवाहीत दिनांक २९/०१/२०१९ रोजी पंचायत समिती मानवत कार्यालयातील शेख हमीद शेख अहमद, वरिष्ठ सहायक लेखा यांनी तक्रारदार यांना सदर कामासाठी पंचासमक्ष ८,०००/– रूपये लाचेची मागणी केली व त्यापैकी पहिला हाप्ता म्हणून दि.२९/०१/२०१९ रोजी पंचायत समिती कार्यालय मानवत येथे शेख हमीद शेख अहमद, वरिष्ठ सहायक,लेखा यांनी पंचासमक्ष लाच म्हणून ४०००/– रू. स्विकारले असता त्यांना लाचेच्या रक्कमेसह पकडण्यात आले. लाचेची रक्कम त्यांचे ताब्यातुन हस्तगत करण्यात आली आहे. त्यांचे विरूध्द पो.स्टे.मानवत येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कार्यवाही मा.पोलीस अधिक्षक श्री.संजय लाटकर ला.प्र.वि. नांदेड परिक्षेत्र नांदेड , श्री.नुरमहंमद शेख, अपर पोलीस अधिक्षक, श्री.गजानन विखे, पोलीस उप अधिक्षक ला.प्र.वि. परभणी यांचे मार्गदर्शनाखाली श्री.अनिल गव्हाणकर, पोलीस निरीक्षक, श्री.विवेकानंद भारती,पोलीस निरीक्षक, पोह/हनुमंते, पोशि/अविनाश पवार, पोशि/चट्टे, पोशि/धबडगे, पोना/अनिल कटारे, पोह/जहगीरदार, पोह/लक्ष्मण मुरकुटे, पोशि/चट्टे, पोना/मुखीद, चापोना/काळे, पोना/बोके, मपोशि/टेहेरे अे.सी.बी.परभणी यांनी यशस्वी केलेली आहे.

परभणी जिल्हयातील नागरीकांनी भ्रष्ट्राचारा विरूध्द व लाचखोर लोकसेवकां विरूध्द तक्रार देण्यासाठी अथवा भ्रष्टाचारा विरूध्द करण्यात येणा–या कारवाई बाबत अधिक माहीतीसाठी खालील दिलेल्या कमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी यांचेकडून केले आहे.

**दुरध्वनी कमांक ०२४५२–२२०५९७**

**टोल फ्री कमांक १०६४**

श्री.संजय लाटकर,पोलीस अधिक्षक,ला.प्र.वि.नांदेड, परिक्षेत्र नांदेड – ९८२३०२८१२२
श्री.नुरमहंमद शेख, अपर पोलीस अधिक्षक – ९८२३३९०३३३
श्री.गजानन विखे, पोलीस उप अधिक्षक – ९९२२५४७८९८
श्री.अनिल गव्हाणकर,पोलीस निरीक्षक – ९८२३६१६१४५
श्री.विवेकानंद भारती, पोलीस निरीक्षक – ९४२३४२९७८६

Email - dyspacpparbhani@gmail.com

पोलीस उप-अधिक्षक अँन्टी करप्शन ब्युरो परभणी

**(अनिल गव्हाणकर)**
**पोलीस निरीक्षक**
**अँन्टी करप्शन ब्युरो परभणी**

Scanned by CamScanner